# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

दूरध्वनी – ०२०-२५६५६२३४/२५६५७१७६

E-Mail: ropune@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.ropune.org.in


जा.क्र : तंशिविकापु/विवि/मुदतठेवी/२०१९/5423 दिनांक : 24 DEC 2019

**परिपत्रक**

प्रति,
संस्थाप्रमुख/प्राचार्य/संचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांच्या अखत्यारीतील,
सर्व पदवी/पदव्युत्तर पदवी/पदविका अभ्यासक्रमांच्या संस्था,

**विषय : तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीत असलेल्या विविध अभ्यासक्रम सुरु करण्याच्या अनुषंगाने संचालक, तंत्रशिक्षण व संस्था यांच्या संयुक्त खात्यात ठेवण्यात आलेल्या मुदतठेवींबाबत...**

संदर्भ :- संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे परिपत्रक,
क्रमांक : १०/एनजीपी /मुदतठेवी/२०१९/१३५० दिनांक ११/१२/२०१९.

१) संस्था व संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबइं यांचे संयुक्त नावे असलेल्या संस्थेने ठेवलेल्या मुदतठेवींचे नूतनीकरण करुन जमा व्याज संस्थेच्या खाती जमा करणे अथवा संबंधीत संस्था/अभ्यासक्रम बंद झाल्यानंतर सदर मुदत ठेवी बंद करुन मुदतठेवीची मूळ रक्कम व त्यावरील व्याज संस्थेच्या खाती जमा करणे याबाबतचा प्रस्ताव थेट संचालनालयास सादर न करता या विभागीय कार्यालयामार्फत सादर करण्यात यावा. प्रस्ताव थेट संचालनालयास सादर केल्यास त्याची संचालनालय स्तरावर दखल घेतली जाणार नाही.

२) उपरोक्त प्रस्ताव सादर करताना सदर मुदतठेवींच्या प्रतींवर बँकेच्या शाखेचे नाव व पूर्ण पत्ता (पिनकोडसह), संस्थेचा डीटीई कोड, अभ्यासक्रमाचा स्तर (पदवी/पदविका/पदव्युत्तर पदवी), अभ्यासक्रमाचे नाव नमूद करुन संस्थेच्या शिक्क्यासह मुदतठेवींच्या प्रती सादर कराव्यात.

३) आपल्या संस्थेबाबतच्या प्रलंबीत तक्रारी, न्यायालयीन प्रकरणे याबाबतची माहिती संस्थाप्रमुखांनी उपरोक्त प्रस्ताव सादर करताना देणे आवश्यक आहे.

(डॉ. दि. रा. नंदनवार)
प्र. सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे

प्रत : मा. संचालक, तंत्रशिक्षण म. रा. मुंबई (कार्यासन क्र.१०) यांना माहितीस्तव सादर.